# अब्राहाम, विश्वासणाऱ्यांनी हा अभ्यास वाचावा

मुलांना शिकवणाऱ्यांनी F1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना.** ''प्रिय स्वर्गातील देवा, या अभ्यासाचा उपयोग माझ्या मंडळी ने अब्राहामासारखे विश्वासात वाढावे यासाठी करून घे, म्हणजे ते फक्त तुझे वचन ऐकणारे न होता त्याप्रमाणे वागणारेही होतील. आम्ही विश्वास ठेवतो त्या गोष्टींचे आज्ञापालन करण्यास आमचे साहाय्य कर. येशूच्या नावात, आमेन.''

1. **देवाचे वचन न प्रार्थनेच्या द्वारे अंतः करणाची तयारी करा**

**पाठ करा याकोब 1:22**

अब्राहामाकडून शिका

- विचार करा पौलाने म्हटले की अब्राहाम हा आमचा विश्वाससंबंधातील आदर्श आहे, गलती. 3:6-9 आमच्या प्रमाणेच अब्राहामामध्ये उणेपणा होता आणि त्याच्या हातूनही चुका झाल्या. तथापि, त्याची संतती आकाशातील ताऱ्यांइतकी होईल असे अभिवचन देवाने दिले तेव्हा त्याने देवावर विश्वास ठेवला त्याचा विश्वास पाहून देवाने त्याला नीतिमान ठरवले, उत्पत्ती 15:1-6. आपणही देवाच्या अभिवचनांवर विश्वास ठेवू या आणि विश्वास न ठेवणाऱ्या हजारो लोकांनी अब्राहामाने विश्वास ठेवला त्या प्रमोण विश्वास ठेवून त्याचे आध्यात्मिक पुत्र व्हावे यासाठी त्यांना साहाय्य करून आपले कर्तव्य पार पाडू या.

**पाहा उत्पत्तीमध्ये...**

- 12:2-3 मध्ये देवाने अब्रामाला कोणते अभिवचन दिले (अब्राहामाचे नाव अगोदर अब्राम असे होते, 17:5)
- 15:1-6 मध्ये अब्रामाने कशावर विश्वास ठेवला की देवाने ते त्याला नीतिमत्व असे गणले.
- 15:7-21 मध्ये देवाने अब्रामाला दिलेल्या आपल्या अभिवचनावर कसे शिक्कामोर्तब केले. अब्रामाने केलेले यज्ञार्पण आणि पक्ष्यांना दूर ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे त्या अभिवचनावर शिक्कामोर्तब झाले का? (उत्तर: देवाचे नियंत्रण सर्व गोष्टींवर होते.)
- 16:1-16 मध्ये देवाचे अभिवचन आपल्या स्वत: च्या परिश्रमांनी पूर्ण करण्याचा अब्रामाचा प्रयत्न.
- 18:1 ते 19:29 मध्ये अब्राहामाच्या विश्वासाची परीक्षा कशी घेतली आणि अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला म्हणून देवाने (सर्व विश्वासणाऱ्या) कोणते अभिवचन दिले.



देवाने आमच्याकडे विश्वास कसा आणला? तुमचा स्वत:चा विश्वास कोठून आला याचा क्षणभर थांबून विचार करा. इष्टमित्रांच्या साक्षीद्वारे? वचनाद्वारे? स्वप्न वा दृष्टांताच्या द्वारे? पवित्र आत्म्याकडून एकांतात मिळालेल्या खात्रीतून? प्रार्थनेच्या द्वारे? येशूच्या नावातील अदूभुत आरोग्याच्या द्वारे?

**2. सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवडयातील कार्यक्रम ठरवा.**

दुर्बल विश्वासामुळे कोणी विश्वासणारे संघर्ष करीत असतील तर त्यांच्याकडे जाऊन त्यांना भेटून अब्राहामाच्या विश्वासाविषयी सांगा, तसेच तुम्ही का विश्वास ठेवता याची साक्ष द्या.

गरजू शेजाऱ्यांची काही व्यावहारिक मार्गाने सेवा करून देवाने दिलेल्या तुमच्या विश्वासाचे प्रात्यक्षिक दाखवा.

दुर्बल विश्वासामुळे संघर्ष करणाऱ्यांबरोबर प्रार्थना करा.

भाग 3 मधील उपासनेच्या काही कार्यकृती त्यांनी आपल्या घरात कराव्यात यासाठी तुम्हांला त्यांना प्रोत्साहन देता येईल.

**3. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनेसाठी योजना आखा.**

विश्वासणाऱ्यांच्या गरजा व स्थानिक रिवाजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

अब्राहामाच्या वृत्तांताचे भाग सांगा किंवा नाट्यीकरण करा.

पुढील सत्ये उलगडून सांगा:

- देवाने अब्राहामाला त्याचे गणगोत सोडून परक्या देशात जाण्यास सांगितले. विश्वासाने त्याने आज्ञापालन केले. त्याने आपली पत्नी व दास-दासी सोबत घेतले आणि शेकडो किलोमीटरचा प्रवास केला.
- त्या भूमीवर देव पुन्हा एकदा बोलला आणि अब्राहामाला पुष्कळ संततीचे वचन दिले. अब्राहामाने देवाच्या अभिवचनावर विश्वास ठेवला आणि त्याचा विश्वास देवाने नीतिमत्व असा गणला.
- देवाने अब्राहामाच्या संतती पैकी एकाच्या द्वारे तो सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करील असे अभिवचन दिले.
- अब्राहामाला त्याचा वारस म्हणून मूल नव्हते त्यामुळे ही अभिवचने कशी पूर्ण होणार याबद्दल त्याला काहीच माहित नव्हते.
- मग देवाने त्याला यज्ञार्पणाची तयारी करण्यास सांगितले. देवाला मनुष्याच्या बरोबर करार स्थापित करण्यासाठी नेहमीच यज्ञार्पणांची आवश्यकता असे. येशूने म्हटले प्रभुभोजन हा त्याच्या रक्तात आमचा करार आहे.
- अब्राहामाने गिधाडांना हाकलून देण्याचा प्रयत्न केला पण तो थकला आणि गाढ झोपी गेला. झोपेत त्याला स्वप्न पडले की देव यज्ञार्पणाच्या मधून चालत आहे आणि अब्राहाम काहीही करत नाही.
- देवच त्याचे अभिवचन पूर्ण करणार आहे हे अब्राहामाला अद्याप समजले नव्हते.
- पुढे, अब्राहामाच्या पत्नीने साराने तिची दासी हागार हिच्या पासून त्याने आपला वंश वाढवावा असे सुचवले.
- अब्राहामाच्या मूर्खपणाच्या प्रयत्नांनी बरेच दु:ख दिले, हागारच्याच एका संताताने काही काळाने इश्माएलची निर्मिती केली.
- अब्राहाम शंभर वर्षांचा झाला तेव्हा साराने इसहाकाला जन्म दिला आणि मुलाचे अभिवचन पूर्ण झाल्याचे त्याने पाहिले. अब्राहामाचे यज्ञार्पण अथवा प्रयत्नांमुळे अभिवचन पूर्ण झाले नाही तर ते केवळ देवाच्याच सामर्थ्याने झाले.
- टीप: विश्वासणारे मुस्लिम लोकांच्या शेजारी राहात असतील तर त्यांना स्पष्ट उलगडा करून सांगा की अब्राहामाला दोन मुले होती. त्याचा पहिला मुलगा हा अब्राहामाच्या पत्नीच्या दासीचा हागारपासून जन्मला होता. त्याचे नाव इश्माएल होते आणि तोच पुढे अरबांचा पूर्वज झाला. इश्माएल हा काही देवाने अब्राहामाला त्याच्या पत्नीच्या द्वारे अभिवचनाने दऊ केलेला वारस नव्हता.

- अब्राहामाला त्याची पत्नी सारा हिच्यापासून दुसरा मुलगा झाला. त्याचेनाव इसहाक होते आणि तो यहूदी लोकांचा पूर्वज झाला देवाने अब्राहामाला प्रकट केले की इसहाक व यहूदी लोकांच्या द्वारेच जगाला देवाच्या अभिवचनांचे आशीर्वाद मिळतील.
- येशू जन्माने यहूदी होता आणि तो इसहाकाचा वंशज होता. अशा प्रकारे अब्राहामाला दिलेली अभिवचने येशूवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी आशीर्वादित करतात. मुस्लिम लोकांनीही येशूवर विश्वास ठेवला पाहिजे.

मुलांनी तयार केलेले कार्यक्रम त्यांना सादर करू द्या

साक्ष देण्यास सांगा.

- देवाच्या सामर्थ्याने नवीन विश्वासणाऱ्यांचे जीवन कशा प्रकारे बदलून टाकले?
- देवाने प्रार्थनांची उत्तरे कशी दिली किंवा आपली अभिवचने कशी पूर्ण केली?

प्रभुभोजनाची ओळख करून देताना थोडक्यात उत्पत्ती 15 मधून अब्राहामाने केलेले यज्ञार्पण आणि देवाने आपली उपस्थिती कशी दाखवली याचा वृत्तांत सांगा. देव यज्ञार्पणाद्वारे त्याच्या अभिवचनांवर शिक्कामोर्तब करतो हे स्पष्ट करून सांगा. अब्राहामाने यज्ञार्पणाच्या मांसापासून पक्ष्यांना हाकलले येशूच्या दाखल्यांमध्ये पक्षी हे सैतानाच्या हस्तक्षेपाचे प्रतिक आहे. यज्ञार्पणे ही देवाच्या दृष्टीने फार महत्वाची आहेत. देवाचा सन्मान करण्यासाठी आम्ही त्यांचा आदर करतो. प्रभुभोजन घेण्यापूर्वी आम्ही अमची पातके कबूल करतो, याद्वारे आम्ही ख्रिस्ताच्या शरीरातून सेवन करताता सैतानाचे 'पक्षी' दूर हाकलतो.

**कविता.** ''विश्वासाचा शत्रू.''

भुकेल्या सर्पाला गर्जना करायला आवडते
    ''काही लोक नरकात यायला किती आसुसले आहेत!''
काही लोकांना किती दुष्ट अधम व्हायचे असते
    ते नरकातील भुतावळीला स्पष्टपणे समजावे
त्याला सत्याचा वीट आहे तरीही तो मान्य करतो
    अर्धवट बुद्धीच्या माणसांना
आमच्या लांडया लबाडया सविनय सांगायला आवडते.
    म्हणूनच ते आमच्या फसवेगिरीला बळी पडतात,

दोन किंवा तीन जणांचे लहान गट तयार करा. एकमेकांचे मार्गदर्शन करून प्रार्थना करा व योजनावर शिक्कमोर्तब करा.

**पाठ करा इफिस 2:8-10**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net